
ज्ञान-विज्ञान विमुक्तये



Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN - 2277 - 5730

An International Multidisciplinary
Quarterly Research Journal

# AJANTA

Volume IX, Issue - IV, October - December - 2020
Marathi Part - I / II

Impact Factor / Indexing
2019 - 6.399 (www.sjifactor.com)

**AJANTA PRAKASHAN**

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - IV OCTOBER - DECEMBER - 2020

MARATHI PART - I / II

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# EDITORIAL BOARD


**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | जीवनवास्तवाचा शोध घेणारी प्रदीप पाटील यांची कविता<br>**डॉ. कमलाकर चव्हाण** | ५४-६१ |
| १३ | ग्रामीण भारताच्या समस्या<br>**डॉ. मधुकर चाटसे** | ६२-६३ |
| १४ | ग्रंथालय संगणकीकरण: एक अभ्यास<br>**डॉ. अनिल महादु चौधरी** | ६४-६९ |
| १५ | आपत्ती व्यवस्थापनात प्रशासनाची भूमिका : विशेष संदर्भ कोरोना<br>**डॉ. ज्योती धायगुडे** | ७०-७३ |
| १६ | युवकांपुढील सामाजिक व राजकीय आव्हाने<br>**प्रा. डॉ. दुधाने प्रल्हाद दत्तात्रय** | ७४-८२ |
| १७ | आदिवासींचे मानवाधिकार - एक समाजशास्त्रीय अध्ययन<br>**प्रा. डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ** | ८३-८९ |
| १८ | भारताच्या लोकसंख्येतील रचनात्मक बदलाचा तुलनात्मक अभ्यास<br>**डॉ. सय्यद सादिक बशीर** | ९०-९४ |
| १९ | महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय<br>**श्री. श्रीकांत दत्तात्रय तनपुरे** | ९५-९७ |
| २० | प्रादेशिक असमतोल - संकल्पनात्मक अध्ययन<br>**डॉ. वैशाली धनराज पाटील**<br>**कानवडे वैशाली दिनकर** | ९८-१०३ |
| २१ | हिंगोली जिल्हा अर्थव्यवस्थेचा चिकित्सक अभ्यास<br>**डॉ. विलास आधाव**<br>**बांगर आकाश शेषराव** | १०४-११० |

VOLUME - IX, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# १९. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय

**श्री. श्रीकांत दत्तात्रय तनपुरे**
सहाय्यक प्राध्यापक, श्री संत गजानन महाविद्यालय खर्डा, ता. जामखेड, जि. अहमदनगर.

**प्रास्ताविक**

वारकरी संप्रदायाचा पाया ज्ञानेश्वरांनी रचला. नंतरच्या काळात या पायावर 'बुडतसे जन' या तळमळीची इमारत भव्य होत गेलेली दिसते. तेराव्या शतकात अनेक संप्रदाय उगम पावले यात प्रामुख्याने महानुभाव व वारकरी संप्रदाय यांचा विस्तार झालेला दिसतो.

मराठी साहित्याच्या प्राचीन कालखंडात साहित्यनिर्मिती विविध संप्रदायांच्या अनुयायांनीच केलेले असून, त्या साहित्याच्या निर्मितीमागे प्राधान्याने संप्रदाय विशिष्ट पारमार्थिक प्रेरणा प्रमुख आहेत. आणि त्यामुळे हे विविध संप्रदाय आणि मराठी साहित्य व भाषा यांचे परस्परांशी अनुबंध कोणते, याचे रहस्य उलगडण्याच्या दृष्टीने या संप्रदायांचा अभ्यास अपरीहार्य ठरतो.

**वारकरी संप्रदाय**

'संत कृपा झाली | इमारत फळा आली |
ज्ञानदेवे रचिला पाया | उभरिले देवलया ||
नामा तयाचा किंकर | तेणे रचियेले ते आवर |
जनार्दन एकनाथ | खांब दिला भागवत ||
तुका झालासे कळस | भजन करा सावकाश ||'

संत बहिनाबाईंनी आपल्या 'संत कृपा झाली' या अभंगातून वारकरी संप्रदायाची इमारत कशी उभा राहिली हे सांगितले आहे. बहिणाबाईंच्या मते वारकरी संप्रदायाचा पाया संत ज्ञानेश्वरांनी रचला. ज्ञानेश्वरांनी शुद्ध भक्तीतत्वावर अधिष्ठित असलेल्या या उपासना मार्गास 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथाच्या रूपाने तात्त्विक अधिष्ठान प्राप्त करून दिले. ज्ञानेश्वरांच्या कर्तुत्वामुळे वारकरी संप्रदाय जनमानसावर प्रभाव गाजवून महाराष्ट्रव्यापी झाला. ज्ञानेश्वरांच्या पूर्वी पासून वारकरी संप्रदाय नाथ संप्रदाय या नावाने अस्तित्वात होता. मात्र ज्ञानेश्वरांच्या उद्याने त्याचे नामांतर झाले. या संप्रदायाचे आराध्य दैवत पंढरपूर येथील विठ्ठल मंदिर आहे. पंढरपूरातील विठ्ठल कसे प्रकट झाले, या विषयी भक्त पुंडलिकाची कथा सांगीतली जाते. पुंडलिक माता-पित्याची सेवा करत असताना, विठ्ठल पुंडलिकाच्या भेटीस आले व पुंडलिकाने माता-पित्याची सेवा भंग होऊ नये म्हणून विठ्ठलाकडे न पाहाता जवळ असलेली एक विट मागे फेकून त्या विटेवर विठोबास उभे राहण्यास सांगीतले. तेव्हा पासून आजपर्यंत विठोबा विटेवर उभा आहे. अशी ही कथा सर्व परिचित आहे, परंतु तसा प्रबळ पुरावा आपल्या जवळ नसल्याने वारकरी संप्रदायाचे खरे प्रवर्तक कोण असा प्रश्न

उपस्थित होतो. तर या प्रश्नाचे उत्तर संत ज्ञानेश्वर हे द्यावे लागते, कारण या संप्रदायाची अधिकृत माहिती मिळते, ती ज्ञानेश्वरांच्या काळापासून.

संत ज्ञानेश्वरानंतर वारकरी संप्रदायाची धुरा संत नामदेवांनी सांभाळली. संत ज्ञानेश्वर हे जरी वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक असले तरी, वारकरी संप्रदायाचे प्रचारक व प्रसारक हे खरे नामदेव होत. कारण पंढरपूरला राहून 'नाचू कीर्तनाचे रंगी | ज्ञानदीप लावू जगी ||' असे कीर्तनाच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसापर्यंत अध्यात्मिक ज्ञान पोहचविण्याचे काम संत नामदेवांनी केले. त्यांनी केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर, उत्तर भारतात भ्रमंती करून वारकरी संप्रदायाचा प्रसार करण्याचे काम त्यांनी केले. त्याचा पुरावा म्हणून आपल्याला पंजाब येथील घुमान या ठिकाणी त्यांची समाधी पाहायला मिळते व आजही भक्त त्या समाधीची सेवा करतात. संत नामदेवामुळे अनेक लोकांचे आचार विचार बदलले तसेच त्यांच्यामुळे समाजाला एक प्रकारची चालना व प्रेरणा मिळाली. संत नामदेवांनी अनेक भक्तिपर अभंगाची रचना केलेली पाहायला मिळते त्यांच्या सर्व अभंगातून पारमार्थिक ओढ दिसून येते.

भगवंताची ध्वजा हातात घेऊन परमार्थाच्या क्षेत्रातील समतेचा डांगोरा पीटीत ज्ञानदेव-नामदेवांच्या प्रभावळीतील अठरापगड जातींच्या संतांनी महाराष्ट्राच्या सामाजिक आणि धार्मिक जीवनात एक प्रकारचे नवचैतन्य निर्माण केले होते. यामुळे अनेक संत निर्माण झाले. त्यामध्ये जानाबाईंनी ज्ञानेश्वरांच्या शिकवणीतून आणि नामदेवांच्या सहवासातून आपले पारमार्थिक जीवन उजळून टाकले. विसोबा खेचर, सावता माळी, नरहरी सोनार, जोगापरमानंद, सेना न्हावी, चोखा मेळा, मुक्ताबाई, जनाबाई, कर्ममेळा इत्यादींनी विठ्ठल भक्तीची अंत:करणाने केलेली अभंगरचना प्रसादपूर्ण आणि मराठीचे काव्यभांडार सुशोभित करणारी आहे. संत नामदेवा नंतर म्हणजे इ.स.१३५० नंतर वारकरी संप्रदायाची स्थिती डळमळीत झाली याला कारण म्हणजे इ.स. १३१३ मध्ये विजयनगर राजवटीचा अस्त व बहामनी राजवटीची सुरुवात होय.

ज्ञानेश्वरांनंतर पुढील २५० वर्षाच्या काळात मुस्लिम आक्रमणामुळे महाराष्ट्राची सांस्कृतिक घडी विस्कटून गेली होती. राजकीय आक्रमणापेक्षा धार्मिक, सांस्कृतिक आक्रमण असलेल्या भक्तिमार्गच समाजाला पुन्हा पूर्वस्थितीवर आणू शकेल. अशी जाणीव एकनाथांना झाली. संत एकनाथांनी या जुन्या भागवत धर्माचे पुनरुज्जीवन करून महाराष्ट्रात नवजागृत निर्माण करण्याचे कार्य हाती घेतले. त्यांच्या कर्तुत्वामुळेच या पडत्या काळात महाराष्ट्राची सत्त्वधारा टिकून राहिली. संत एकनाथांनी 'चतु:श्लोकी भागवत', 'रुक्मिणीस्वयंवर', एकनाथी भागवत' इ. ग्रंथ लिहिले. 'एकनाथी भागवत' हा ग्रंथ १८००० ओव्यांचा असून 'खांब दिला भागवत' या गौरवास पात्र ठरतो. संत एकनाथांच्या कार्यामुळे वारकरी संप्रदाय पुन्हा प्रसिद्धीस आला.

एकनाथांनंतर संत तुकाराम महाराजांनी वारकरी संप्रदायाची धुरा सांभाळली. संत तुकाराम महाराजांच्या आपल्या अभंगवाणीतून विठ्ठलाविषयीची व अध्यात्माविषयीची त्यांची असणारी ओढ दिसून

येते. त्यांच्या अभंगात अवघा महाराष्ट्र भक्तिमय झाला. आजही २१ व्या शतकामध्ये जागतिकीकरणाच्या युगातही तुकाराम महाराजांची अभंगवाणी सबंध महाराष्ट्राच्या मुखोदगत आहे. अशी ख्याती असलेले संत तुकाराम महाराज वारकरी संप्रदायाच्या मंदिराचे कळस झालेले आहेत.

वारकरी संप्रदायाचे विशेष म्हणजे आजही अनेक गावांमध्ये 'अखंड हरिनाम सप्ताह' सारखी परंपरा टिकून आहे. तसेच वारकरी संप्रदायातील भक्तांचे प्रबोधन कीर्तनाच्या माध्यमातून केले जाते. संत नामदेवांपासून चालत आलेली ही परंपरा आजही टिकून आहे. आजही ठिकठिकाणी कीर्तन होताना दिसून येते. कीर्तनाच्या माध्यमातून कीर्तनकार संत नामदेव, संत तुकाराम यांच्या अभंगतील भागवत भक्तीचे महत्त्व पटवून देतात.

**समारोप**

वारकरी संप्रदायाचे पंढरपूर, पैठण, आळंदी, देहू हे दैवत स्थळे आहेत. या ठिकाणी विशिष्ट वेळी भक्त जमा होत असतात. म्हणून मध्ययुगात उगम पावलेला हा संप्रदाय आजही आपले अस्तित्व टिकवून आहे. हेच त्याचे फलित आहे.

**संदर्भ**

१. गोसावी र. रा., पाच भक्तिसंप्रदाय, प्रतिमा प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती २००८
२. जोशी प्र. न., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २००२
३. नसिराबादकर ल. रा., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, व्दितीय आवृत्ती.